## वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग

## 2.3 पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आणि पदव्युत्तर जागा निर्माण करण्यासाठी राज्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे बळकटीकरण/ दर्जावाढ

### 2.3.1 प्रस्तावना

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकारने 11[व्या] योजनेच्या अखेरीस केंद्र शासनाद्वारे पुरस्कृत "राज्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे बळकटीकरण/दर्जावाढ" ही योजना पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी ज्याद्वारे नवीन पदव्युतर अभ्यासक्रमांसाठी पदव्युत्तर जागा वित्तीय सहाय्याद्वारे निर्माण करणे यासाठी सुरू केली, योजनेचा वैधता कालावधी संपूर्ण 12[व्या] योजनेचा कालावधी (2012-13 ते 2016-17) हा होता. पुढे तो मार्च 2019 पर्यंत विस्तारित करण्यात आला.

वैद्यकीय शिक्षण संशोधन आणि नैदानिक उपचार यांची गुणवत्ता सुधारणे आणि देशातील विशेषज्ञांची कमतरता कमी करणे, पदव्युत्तर शिक्षण सोयी सुविधांच्या दर्जेत वाढ करण्याची निकड असल्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापकांची नियुक्ति करणे, मूलभूत सोयी सुविधा आणि उपकरणांमध्ये सुधारणा आणि पदव्युतर विद्यार्थ्यांच्या अंर्तग्रहण क्षमतेमध्ये, नवीन आणि विद्यमान पाठ्यक्रमांच्या जागा वाढवून, वाढ करणे ही योजनेची उद्दिष्ट्ये आहेत. आरोग्य सेवा संचालनालयातंर्गत आणि सशक्तीकरण समितीद्वारा दिलेल्या अनुमोदनानंतर तांत्रिक मूल्यमापन समितीच्या शिफारसींच्या आधारावर योजनेसाठीचा निधी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे थेट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना देण्यात आला. निधीचे प्रदान होण्यापूर्वी राज्य शासनाला सामंजस्य करारावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून दोन हप्त्यांमध्ये निधीचे संवितरण करायचे होते. निधी केंद्र सरकार आणि राज्य शासनामध्ये 75:25 या प्रमाणात वाटून घ्यायचा होता.

तांत्रिक मूल्यमापन समितीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना दिनांक 13.09.2010 आणि 16.09.2010 दरम्यान दिलेल्या भेटींच्या आणि केलेल्या शिफारसींच्या आधारावर आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने महाराष्ट्रातील 11 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची[15] योजनेच्या अंमलबजावणीसाठी निवड केली (11.10.2011 आणि 26.12.2011) आणि ₹ 259.34 कोटींचा केंद्राचा वाटा (75

---

15 शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला; शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई; शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद; शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे; शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर; इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर; शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड; बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे; शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सांगली-मिरज; शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर; शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ.

टक्के) आणि ₹ 86.45 कोटींचा राज्याचा वाटा (25 टक्के) अशा एकूण ₹ 345.79 कोटींच्या निधीला मान्यता प्रदान केली. ह्या रकमेला नवीन भांडवली मालमत्ता निर्माण करून, वैद्यकीय उपकरणांचे उन्नतिकरण आणि प्राध्यापकांची नियुक्ति करून दोन[16] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत 116 पदव्युत्तर जागा निर्माण करून पदव्युत्तर पाठयक्रम सुरू करण्यासाठी आणि उर्वरित नऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये 112 विद्यमान पाठयक्रमांसाठी 409 पदव्युत्तर जागा वाढविण्यासाठी आणि 60 नव्या पदव्युत्तर पाठयक्रमांसाठी 167 पदव्युत्तर जागा निर्माण करण्यासाठी मान्यता देण्यात आली.

### 2.3.2 लेखापरीक्षेची व्याप्ति आणि कार्यपद्धती

योजनेचे प्रभावी आणि कार्यक्षम कार्यान्वयन, पर्याप्त निधीचे प्रदान, योजनेचे अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी प्रभावी संनियंत्रण याकरिता योग्य नियोजनाची खात्री करता यावी म्हणून, मे 2019 ते ऑक्टोबर 2019 दरम्यान लेखापरीक्षण करण्यात आले.

प्रयोजनाकरिता, महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, संचालनालय आणि 11 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या 2011-12 ते 2018-19 कालावधीकरिता अभिलेख्यांची चाचणी तपासणी करण्यात आली.

शासनाला निष्कर्ष जारी करण्यात आले (फेब्रुवारी 2020), शासनाचे उत्तर जून 2020 पर्यंत प्रतिक्षित होते.

### लेखापरीक्षणातील निष्कर्ष

### 2.3.3 योजनेची उद्दिष्टे पूर्ण झाली नाहीत

लेखापरीक्षणात सर्व 11 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील अभिलेखे तपासले आणि मार्च 2019 अखेरीस ₹ 194.54 कोटींच्या[17] एकूण उपलब्ध निधीपैकी ₹ 177.35 कोटी[18] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांद्वारे खर्च झाल्याचे आढळले आणि 692 पदव्युत्तर जागांच्या[19] उद्दिष्टाच्या तुलनेत केवल 79 पदव्युत्तर जागा (11 टक्के) वाढवता/निर्माण करता आल्या. अशाप्रकारे, 409 जागा वाढविण्याच्या उद्दिष्टाच्या तुलनेत केवळ 7 जागा (1.71 टक्के) वाढविल्या जाऊ शकल्या आणि 283 जागा निर्माण करण्याच्या उद्दिष्टाच्या तुलनेत 72 जागा (25 टक्के) निर्माण होऊ शकल्या. शासकीय वैद्यकीय महाविद्यालये मुक्त केलेल्या निधीपैकी 91 टक्के खर्चून,

16 शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे.

17 भारत सरकारचा नोव्हेंबर 2011 आणि जानेवारी 2012 दरम्यान वितरित झालेला ₹ 129.57 कोटींचा वाटा आणि राज्य शासनाचा 2014-15 आणि 2018-19 दरम्यान वितरित झालेला ₹ 64.97 कोटींचा वाटा.

18 भारत सरकारचा वाटा ₹ 112.38 कोटी आणि राज्य शासनाचा वाटा ₹ 64.97 कोटी.

19 नवीन 98 अभ्यासक्रमातील 283 जागा सध्या अस्तित्वात असलेल्या 112 अभ्यासक्रमातील 409 अतिरिक्त जागा.

लक्षित 692 जागांपैकी फक्त 79 (11 टक्के) पदव्युतर जागा योजनेच्या प्रारंभापासून सात वर्षांनंतर सुद्धा ज्यात दोन वर्षांचा विस्तारित कालावधी समाविष्ट आहे, निर्माण करू शकले.

योजनेचे पदव्युत्तर जागा निर्माण करण्याचे/वाढविण्याचे लक्ष्य साध्य न केल्याची कारणे पुढील परिच्छेदांत आणली आहेत.

### 2.3.3.1 पायाभूत सुविधांची कामे पूर्ण होण्यास विलंब

लेखापरीक्षणात असे दिसून आले की शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई मध्ये एप्रिल 2017 मध्ये फेब्रुवारी 2019 पर्यंत पूर्ण होणाऱ्या वाचनालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी ₹ 1.74 कोटी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड ने 12 पदव्युतर विभागांच्या स्थापत्य बांधकामासाठी राखून ठेवलेला भारत सरकारचा वाटा ₹ 8.93 कोटी, जुलै 2014 मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वळती केला ज्यायोगे महाराष्ट्र शासनाद्वारे अनुदानित महाविद्यालय आणि रूग्णालयाचे बांधकाम जे ऑगस्ट 2015 पर्यंत, महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेसह परंतु आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मान्यतेविना पूर्ण करायचे होते (जून 2011 मध्ये इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूरच्या प्रकरणांत घडले होते). परंतु ही कामे डिसेंबर 2019 पर्यंत सुधारित प्रशासकीय अनुमोदनाअभावी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसोबत पाठपुराव्या अभावी अपूर्ण राहिली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड मधील 12 पदव्युतर अभ्यासक्रमाकरिता, 36 पदव्युतर जागांच्या निर्मितीसाठी या पायाभूत सुविधांची निर्मिती निर्णायक होती.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी उत्तर दिले (जानेवारी 2020) की शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेडकडून अहवाल मागविला जाईल.

### 2.3.3.2 उपकरणे खरेदी करण्यासाठी कालमर्यादा न ठरविल्यामुळे निधीची अडवणूक झाली

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाबरोबरच्या सामंजस्य करारानुसार महाराष्ट्र शासनाने अंगिकारलेल्या बोली/खरेदी प्रक्रियेच्या अनुरूप प्रक्रिया अनुसरली पाहिजे आणि त्यामध्ये असे ही सांगितले आहे की विद्यमान विभागांमधील उपकरणांची आवश्यकता लक्षात घेऊन कालमर्यादा निश्चित केल्या पाहिजेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये राज्य स्तरीय खरेदी समिती मार्फत वर्ष 2016-17 पर्यंत उपकरणे खरेदी करण्यात आली आणि त्यानंतर महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले (जुलै 2017) की 15 ऑगस्ट 2017 पासून केवळ हाफकिन जीव औषधशास्त्रीय महामंडळ मर्यादित, मुंबई एक सरकारी कंपनी जी पूर्णतः महाराष्ट्र सरकारच्या मालकीची आणि कंपनी अधिनियम, 1956 अंतर्गत नोंदणीकृत आहे, मार्फत औषधे, वैद्यकीय उपकरणे आणि इतर संबंधित वस्तू खरेदी कराव्यात.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की सामंजस्य करारानुसार आवश्यक असणारी कोणतीही कालमर्यादा निश्चित न करता 2017-18 ते 2018-19 या कालावधीत 11 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी 200 वैद्यकीय उपकरणे खरेदीसाठी ₹ 35.03 कोटी हाफकिन जीव औषधशास्त्रीय महामंडळ मर्यादितला हस्तांतरित केले. परंतु सात[20] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना ₹ 5.75 कोटी मध्ये केवळ 24 उपकरणे प्राप्त झाली. म्हणूनच, हाफकिन जीव औषधशास्त्रीय महामंडळ मर्यादितकडे निधी हस्तांतरित झाल्यापासून सुमारे दोन वर्षानंतरही ₹ 29.28 कोटी इतकी रक्कम सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी 176 आवश्यक उपकरणे खरेदी न करता पडून आहे.

यामुळे नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी 283 जागा निर्माण करण्याच्या आणि 11 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सध्याच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी 409 जागा वाढविण्याच्या योजनेचे उद्दिष्ट विफल होण्याबरोबरच ₹ 29.28 कोटींची अडवणूक झाली.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी तथ्य मान्य केले आणि सांगितले (जानेवारी 2020) की साधनांच्या खरेदीच्या कालबद्ध प्रक्रियेसाठी महाराष्ट्र शासनाकडून आवश्यक सूचना प्राप्त केल्या जातील. उत्तर स्वीकार्य नाही कारण, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय किंवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी सामंजस्य करारात उपकरणे खरेदीसाठी कालमर्यादा निश्चित करण्याचे प्रावधान असताना सुद्धा त्याची खात्री केली नाही.

### 2.3.3.3 मूळ प्रस्तावात निर्दिष्ट नसलेल्या उपकरणांची खरेदी

पदव्युत्तर जागांची वाढ करण्यासाठी/जागा निर्माण करण्यासाठी सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे घटक निहाय आणि अभ्यासक्रम निहाय प्रस्ताव सादर करण्यासाठी योजनेच्या मार्गदर्शक सूचना आणि सामंजस्य करार यांमध्ये सूचना विहित केल्या आहेत.

लेखापरीक्षणामध्ये असे आढळले की मूळ प्रस्ताव नऊ[21] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकडे उपलब्ध/अंशतः उपलब्ध आहेत आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद आणि नांदेड कडे उपलब्ध नाहीत. ज्या नऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये हे प्रस्ताव उपलब्ध/अंशतः उपलब्ध होते त्यापैकी आठ[22] मध्ये असे लक्षात आले की ₹ 21.32 कोटींची 131 उपकरणे खरेदी केली गेली (2014-15 ते 2018-19) जी मूळ प्रस्तावित योजनांमध्ये समाविष्ट असलेल्यांपेक्षा वेगळी होती. यामुळे आठ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील 43 विभागांमध्ये 138 पदव्युतर जागा निर्माण होऊ शकल्या नाहीत.

---

20 अकोला, अंबाजोगाई, औरंगाबाद, धुळे, नागपूर, नांदेड आणि पुणे.

21 अकोला, अंबाजोगाई, धुळे, लातूर, मिरज, नागपूर, पुणे, सोलापूर आणि यवतमाळ.

22 अकोला, अंबाजोगाई, धुळे, लातूर, मिरज, नागपूर, सोलापूर आणि यवतमाळ.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी मूळ मंजूर प्रस्तावावरून उपकरणे खरेदीतील विचलन स्वीकारले (जानेवारी 2020). पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या उपकरणांसाठी भारतीय वैद्यक परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांमधील बदल या विचलनाला कारणीभूत होता. उत्तर समर्थनीय नाही कारण विचलनास आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाची मान्यता मिळवून घ्यायला हवी होती, ज्याने की मूळ प्रस्ताव मंजूर केले होते.

### 2.3.3.4 प्राध्यापक नियुक्ति घटकांतर्गत कोणतीही कृति नाही

फक्त आठ[23] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाला प्रस्तुत केलेले मूळ प्रस्ताव लेखापरीक्षणात सादर केले. ज्यामध्ये भारतीय वैद्यक परिषदेच्या निकषांवर आधारित 157 प्राध्यापकांच्या स्थितीचे अंतर दर्शविले होते. मार्च 2019 पर्यंत 11 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या संदर्भात प्राध्यापकांच्या स्थितीत 236 ची कमतरता दिसून आली.

लेखापरीक्षणामध्ये असे दिसून आले की शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे यांनी प्राध्यापक घटकासाठी वितरित ₹ 0.81 कोटी पैकी ₹ 0.53 कोटी खर्च केले परंतु पदव्युत्तर जागांमध्ये वाढ करता आली नाही. केंद्रीय वाटा मिळाल्याच्या दिवसापासून सुमारे आठ वर्षांचा कालावधी उलटून गेल्यावरही बाकीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी प्राध्यापक घटकांतर्गत कोणतीही रक्कम खर्च केली नाही. यामुळे भारतीय वैद्यक परिषदेने पाच[24] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना पात्र प्राध्यापकांच्या अनुपलब्धतेमुळे मान्यता दिली नाही.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी उत्तर दिले (जानेवारी 2020) की शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी अस्तित्वात असलेल्या प्राध्यापकांच्या सेवांचा वापर केला म्हणून प्राध्यापक घटकांतर्गत असलेली रक्कम विनावापर पडून राहिली. उत्तर समर्थनीय नाही कारण जर अस्तित्वात असलेला प्राध्यापक वर्ग पदव्युत्तर जागा वाढविण्यासाठी/निर्माण करण्यासाठी पुरेसा असेल तर प्राध्यापक घटकासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळे प्राध्यापक घटकावर अवलंबून असलेल्या 324 जागा 10 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या 95 अभ्यासक्रमांमध्ये निर्माण/वाढविता आल्या नाहीत.

### 2.3.3.5 प्राध्यापक नियुक्ति घटकांतर्गत मंजूर निधीचे विचलन

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या सुचनेनुसार (ऑक्टोबर आणि डिसेंबर 2011) निधीचे कोणतेही विचलन न करता हा निधी विशिष्टरित्या पायाभूत सुविधांचा विकास, उपकरणांची खरेदी आणि प्राध्यापकांची भरती यासाठी वापरला गेला पाहिजे.

---

[23] अकोला, अंबाजोगाई, धुळे, लातूर, मिरज, पुणे, सोलापूर आणि यवतमाळ.

[24] अकोला, अंबाजोगाई, धुळे, सोलापूर आणि यवतमाळ.

सहा [25] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या लेखापरीक्षणात असे आढळले की प्राध्यापक घटकांतर्गत मिळालेल्या ₹ 8.57 कोटीच्या एकूण निधीपैकी ₹ 7.72 कोटी प्राध्यापक घटकांव्यतिरिक्त इतर घटकांवर खर्च झाले ज्यायोगे झालेल्या निधीचे विचलन तसेच आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या निर्देशांचे उल्लंघन ***परिशिष्ट 2.3.1*** मध्ये दर्शविले आहे.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी विचलन स्वीकारले आणि सांगितले (जानेवारी 2020) की निधीच्या पुढील मंजुरींमधून वळवलेली रक्कम समायोजित करण्यासाठी सूचना दिल्या जातील. उत्तर स्वीकार्य नाही कारण प्राध्यापक घटकांतर्गत निधीचे विचलन केल्याने सहा महाविद्यालयांतील 63 अभ्यासक्रमांसाठी 218 जागा निर्माण करण्याचे उद्दिष्ट विफल ठरले.

### 2.3.3.6 आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून परवानगी घेण्यास विलंब झाल्यामुळे नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला नाही/पदव्युत्तर जागा निर्मित केल्या नाही

भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, 1956 मध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांद्वारे नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी/पदव्युत्तर जागांमध्ये वाढ करण्यासाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून परवानगी मिळविण्याची तरतूद आहे. या उद्देशासाठी भारत सरकारने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना घटक निहाय आणि अभ्यासक्रमनिहाय अनुदाने मंजूर केली.

लेखापरीक्षणामध्ये असे दिसून आले की तीन [26] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पायाभूत सुविधा आणि उपकरणे घटकांतर्गत 10 पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये 33 जागा निर्माण करणे/जागा वाढविण्यासाठी भारत सरकारने ₹ 8.64 कोटी मंजूर केले. तसेच या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी या दोन घटकांवर ₹ 11.01 कोटी खर्च केले ज्यायोगे पदव्युत्तर जागा निर्माण/प्रारंभ करण्याचे निकष पूर्ण केले. तथापि, या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी ***परिशिष्ट 2.3.2*** मध्ये दर्शविल्यानुसार नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याच्या/पदव्युत्तर जागा वाढविण्याच्या परवानगीसाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे अर्ज केला नाही. यामुळे पायाभूत सुविधा आणि उपकरणे घटकांच्या अंतर्गत मंजूर रकमेपेक्षा जास्त खर्च करूनही 10 पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये 33 पदव्युत्तर जागा निर्माण केल्या जाऊ शकल्या नाहीत.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी उत्तर दिले (जानेवारी 2020) की शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकडून स्पष्टीकरण मागविले जाईल आणि त्यानुसार पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आणि पदव्युत्तर जागा वाढविण्यास परवानगी मिळविण्यासाठी अर्ज करण्याच्या सूचना दिल्या जातील.

---

[25] अंबाजोगाई, औरंगाबाद, लातूर, नांदेड, सोलापूर आणि यवतमाळ.

[26] अंबाजोगाई, औरंगाबाद आणि यवतमाळ.

### 2.3.3.7 निधीचे विचलन

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज यांना एकूण ₹ 18.08 कोटींचा निधी मंजूर केला (ऑक्टोबर 2011). त्यापैकी पायाभूत सुविधांसाठी ₹ 2.50 कोटी उपकरणांसाठी ₹ 10.58 कोटी आणि प्राध्यापकांसाठी ₹ पाच कोटी अपेक्षित होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला ₹ 6.68 कोटींचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला (नोव्हेंबर 2011).

लेखापरीक्षणात आढळले की मंजुरी आदेशानुसार केवळ ₹ 2.50 कोटी पायाभूत सुविधा घटकासाठी अपेक्षित होते. परंतु शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरजने ₹ 6.68 कोटींची संपूर्ण रक्कम सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज यांना हस्तांतरित केली (मार्च 2012). अशाप्रकारे, उपकरणे आणि प्राध्यापक घटकांसाठीची ₹ 4.18 कोटींची रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वळविली आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज यांना हस्तांतरित झाल्याच्या 30 महिन्यानंतर ही रक्कम परत करण्यास सांगितले (नोव्हेंबर 2014). तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज ने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला पाच वर्षे राखून ठेवल्यानंतर ₹ 4.18 कोटी परत केले (फेब्रुवारी 2017).

यामुळे निधीचे अनियमित विचलन झाले आणि नैदानिक उपचारांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याचे योजनेचे उद्दिष्ट विफल ठरले. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ₹ 4.18 कोटी मिळाल्यानंतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने अस्थिरोगशास्त्र, मेडिसीन आणि बालरोगशास्त्र विभागांसाठी उपयुक्त असे बहुउद्देशीय उपकरण डिजीटल सबट्रॅक्शन अँजिओग्राफी खरेदी करण्याचा प्रस्ताव सादर केला (फेब्रुवारी 2017), जे आजपर्यंत खरेदी केले जाऊ शकले नाही. तसेच जर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने ₹ 6.68 कोटींऐवजी पायाभूत घटकांसाठी फक्त ₹ 2.50 कोटी हस्तांतरित केले असते तर डिजीटल सबट्रॅक्शन अँजिओग्राफी मशीन फ्रेबुवारी 2017 च्या बऱ्याच अगोदर खरेदी करता आली असती.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज यांनी सांगितले (जून 2019) की संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन कार्यालयात (जानेवारी 2012) रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशांनुसार संपूर्ण केंद्रीय वाट्याची रक्कम सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज कडे हस्तांतरित केली. उत्तर स्वीकार्य नाही कारण पायाभूत सुविधा घटकांतर्गत मंजूर रक्कम केवळ ₹ 2.50 कोटी होती.

### 2.3.3.8 पदव्युत्तर अभ्यासक्रमाची अमान्यता

लेखापरीक्षणात सहा[27] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आढळले की भारतीय वैद्यक परिषद, 1956 च्या कलम 10A(2)(a) नुसार या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी पदव्युत्तर जागा वाढविण्यास/नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी मिळविण्यासाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे अर्ज

[27] अकोला, अंबाजोगाई, धुळे, नागपूर, सोलापूर आणि यवतमाळ.

केले होते (जून 2014 ते जुलै 2018). तथापि, प्राध्यापकांची कमतरता, अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि उन्नत उपकरणांची अनुपलब्धता ही कारणे उदधृत करून आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने (2017-18 ते 2019-20 या शैक्षणिक वर्षांदरम्यान) परवानगी दिली नाही.

अशाप्रकारे, या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांपैकी चार[28] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांजवळ ₹ 11.84 कोटींचा भारत सरकारचा अखर्चित निधी असून देखील आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने दर्शविलेल्या उणीवा न सुधारल्यामुळे पदव्युत्तर जागांची निर्मिती/पदव्युत्तर जागांमध्ये वाढ झाली नाही.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी तथ्य स्वीकारताना सांगितले (जानेवारी 2020) की उणीवा दूर करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

## 2.3.4 नियोजनाचा अभाव

### 2.3.4.1 सविस्तर कृति आराखडा तयार न करणे

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय/शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांद्वारे खर्चाच्या औचित्याची तपासणी करण्याच्या कार्यपद्धती (जसे अंदाज मूल्य/मागील पुरवठ्याची निविदा किंमत इत्यादि) यासह विस्तृत कृती आराखडा तयार करण्यासाठी सामंजस्य करार विहित करतो.

लेखापरीक्षणात असे आढळले की वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय/ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी या योजनेच्या अंमलबजावणीसाठी कोणताही विस्तृत कृति आराखडा तयार केला नाही.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी उत्तर दिले (जानेवारी 2020) की महाविद्यालयीन परिषदेच्या बैठकीत नियमितपणे चर्चा होते. उत्तर स्वीकार्य नाही कारण त्यांनी विहित कृति आराखडा तयार करणे आवश्यक होते. चर्चा हे योग्य प्रकारे मान्यता प्राप्त कृति आराखडा जो की योजनेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी निर्देशित आणि समन्वित प्रयत्न असते याला पर्याय असू शकत नाही.

### 2.3.4.2 बाबनिहाय निधीसाठी विनंती पाठविली नाही

सामंजस्य करारामध्ये सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी त्यांनी तयार केलेल्या आर्थिक आराखड्यावर आधारित बाबनिहाय निधीसाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे बऱ्याच आधी विनंती पाठविण्याचे विहित आहे.

असे दिसून आले की कोणत्याही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने बाबनिहाय निधी वितरित करण्यासाठी कोणतीही विनंती पाठविली नाही. आठ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या[29] संदर्भात लेखापरीक्षणात केलेल्या विश्लेषणावरून असे दिसून आले

[28] अकोला, अंबाजोगाई, धुळे आणि नागपूर अनुक्रमे ₹ 2.50 कोटी, ₹ 0.40 कोटी, ₹ 7.86 कोटी आणि ₹ 1.08 कोटी

[29] अकोला, अंबाजोगाई, औरंगाबाद, मिरज, नागपूर, नांदेड, सोलापूर आणि यवतमाळ

की जर या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी तीन पैकी म्हणजे पायाभूत सुविधा, उपकरणे आणि प्राध्यापक यांपैकी कोणत्याही एका घटकासाठी आर्थिक आराखडा तयार केला असता तर ***परिशिष्ट 2.3.3*** मध्ये वर्णन केल्यानुसार ₹ 33.42 कोटींचा खर्च करून 157 पदव्युत्तर जागा निर्माण करता आल्या असत्या. या उलट, जरी आठ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना ₹ 87.62 कोटींचा केंद्रीय वाटा मिळाला (नोव्हेंबर 2011 ते जानेवारी 2012) तरी ते केवळ ₹ 20.77 कोटी खर्च करू शकले ज्यामुळे केवळ 24 पदव्युत्तर जागा निर्माण होऊ शकल्या.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी उत्तर दिले (जानेवारी 2020) की आगाऊ विनंती पाठविण्याची गरज नव्हती कारण आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून बाबनिहाय निधी कधीही वितरित केला जात नव्हता. उत्तर समर्थनीय नाही कारण सामंजस्य करारामध्ये नमूद केल्यानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी अशी आगाऊ विनंती पाठविली नाही तर आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय बाबनिहाय निधी वितरित करू शकत नाही.

## 2.3.5 वित्तीय व्यवस्थापन

### 2.3.5.1 महाराष्ट्र शासनाकडून निधीचे संवितरण

भारत सरकारकडून मिळालेल्या निधीची स्थिती आणि त्या तुलनेत महाराष्ट्र शासनाच्या वाट्याचे संवितरण आणि 11 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी केलेला खर्च **तक्ता 2.3.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

**तक्ता 2.3.1 : 2011-19 दरम्यान मिळालेला निधी आणि झालेला खर्च**

(₹ कोटींमध्ये)

| वर्ष | प्रारंभिक शिल्लक | प्राप्त झालेला निधी | | | झालेला खर्च | | | अंतिम शिल्लक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भारत सरकार | राज्याचा वाटा | एकूण (2+3+4) | भारत सरकारचा निधी | राज्याचा वाटा | एकूण | भारत सरकार | राज्याचा वाटा | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 2011-12 | 0.00 | 129.57 | 0 | 129.57 | 0 | 0 | 0 | 129.57 | 0 | 129.57 |
| 2012-13 | 129.57 | 0 | 0 | 129.57 | 0.14 | 0 | 0.14 | 129.43 | 0 | 129.43 |
| 2013-14 | 129.43 | 0 | 0 | 129.43 | 4.62 | 0 | 4.62 | 124.81 | 0 | 124.81 |
| 2014-15 | 124.81 | 0 | 1.09 | 125.90 | 29.64 | 1.09 | 30.73 | 95.17 | 0 | 95.17 |
| 2015-16 | 95.17 | 0 | 13.61 | 108.78 | 35.31 | 13.61 | 48.92 | 59.86 | 0 | 59.86 |
| 2016-17 | 59.86 | 0 | 15.19 | 75.05 | 29.91 | 15.19 | 45.10 | 29.95 | 0 | 29.95 |
| 2017-18 | 29.95 | 0 | 19.88 | 49.83 | 4.18 | 19.88 | 24.06 | 25.77 | 0 | 25.77 |
| 2018-19 | 25.77 | 0 | 15.20 | 40.97 | 8.58 | 15.20 | 23.78 | 17.19 | 0 | 17.19 |
| **एकूण** | | **129.57** | **64.97** | | **112.38** | **64.97** | **177.35** | | | |

सारणी 2.3.1 वरून असे दिसून आले की आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकारने ₹ 129.57 कोटींचा पहिला हप्ता सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना थेट वितरित केला (नोव्हेंबर 2011 आणि जानेवारी 2012). त्यापैकी मार्च 2019 पर्यंत ₹ 112.38 कोटी इतका खर्च झाला आणि ₹ 17.19 कोटींची

अखर्चित शिल्लक राहिली. तथापि, महाराष्ट्र शासनाने त्यांचा ₹ 86.45 कोटी वितरित करावयाच्या वाट्यापैकी फक्त ₹ 64.97 कोटींचा वाटा वितरित केला. परिणामी ₹ 21.48 कोटींचे कमी वाटप झाले. तसेच भारत सरकारचा पहिला वाटा मिळाल्यानंतर दोन ते तीन वर्षांनी महाराष्ट्र शासनाने हप्त्यांमध्ये आपला वाटा वितरित केला. जरी भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाकडून 75:25 च्या प्रमाणात अनुदान दिले जायचे होते तरी अनुदानाचे वितरण अशाप्रकारे समन्वयित केले नव्हते.

याव्यतिरिक्त आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने 11 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना पुढील वाटप करण्यासाठी महाराष्ट्र शासनाला (ऑक्टोबर 2017 ते सप्टेंबर 2018) ₹ 103.82 कोटींचा शेवटचा आणि अंतिम हप्ता वितरित केला. तथापि, ही रक्कम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना वितरित केली गेली नव्हती. असे निदर्शनास आले की चार[30] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी महाराष्ट्र शासनाला आणि वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांना शिल्लक रक्कम म्हणजे भारत सरकारच्या वाट्याचा शेवटचा हप्ता वितरित करण्याची विनंती केली (जुलै 2016 आणि मार्च 2019 दरम्यान). भारत सरकारचा वाटा न मिळाल्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई एमआरआय मशीन खरेदी करू शकले नाही आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद पायाभूत सुविधा पूर्ण करू शकले नाही. तसेच, वर्ष 2018-19 च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्र शासनाने 'मुख्य शीर्ष - 4210' अंतर्गत ₹ 49.93 कोटींची तरतूद केली. तथापि, हे सुद्धा संबंधित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना वितरित केले नाही.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाने उत्तर दिले (जानेवारी 2020) की महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने योजनेची अद्ययावत माहिती जसे उद्दिष्टे, लक्ष्य, साध्य, प्राप्त झालेल्या भारत सरकारच्या/महाराष्ट्र शासनाच्या निधीचा वाटा, झालेला खर्च, सादर केलेली उपयोगिता प्रमाणपत्रे इत्यादि मागितली आहे. हे सर्व संबंधित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकडून मागविले आहे (मार्च 2019).

अशाप्रकारे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना निधीच्या वितरणात झालेला विलंब, अल्प वितरण आणि वितरण न होणे यामुळे योजनेची लक्ष्ये साध्य झाली नाहीत आणि उद्दिष्टे गाठली गेली नाहीत.

### 2.3.5.2 अर्थसंकल्प शीर्षांतर्गत वाटप करण्यात आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या वाट्याचे असंवितरण

अर्थसंकल्प शीर्ष 4210-वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील भांडवली खर्च, 03-वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण आणि संशोधन, 105-एलोपॅथी (केंद्र पुरस्कृत योजना), (00), (39)-SUSGMC आणि नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणे आणि पदव्युत्तर जागा वाढवणे, 52-यंत्रसामुग्री आणि उपकरणे वर्ष 2013-14 पासून यंत्रसामुग्री आणि उपकरणे खरेदीशी संबंधित आहे.

---

[30] अंबाजोगाई, औरंगाबाद, पुणे आणि यवतमाळ.

नागरी अर्थसंकल्पीय अंदाज आणि विनियोग खात्याच्या छाननीत असे निदर्शनास आले की वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाने 2013-14 च्या अर्थसंकल्पात यंत्रे आणि उपकरणे खरेदीसाठी पुरवणी अनुदान म्हणून ₹ 20 कोटींची तरतूद केली (डिसेंबर 2013). तथापि, ही रक्कम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना वितरित केली नव्हती. हे देखील निदर्शनास आले की 2014-15 आणि 2016-17 मध्ये संबंधित वर्षांच्या मार्च महिन्यात अनुक्रम ₹ 12.91 कोटी आणि ₹ 4.74 कोटींचे अनुदान समर्पित केले.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी उत्तर दिले (जानेवारी 2020) की चौथ्या तिमाहीत ₹ 20 कोटी पुरवणी अनुदान म्हणून देण्यात आले आणि त्यासाठी खर्च करण्यास अपुरा वेळ मिळाला. म्हणून त्याचे पुनर्वितरण करण्यात आले आणि अंतिम सुधारित अनुदान 'निरंक' वर आणले गेले. उत्तर स्वीकार्य नाही कारण 2013-14 साठीच्या विनियोग लेख्यांमध्ये ₹ 20 कोटींची बचत दर्शविली आहे.

### 2.3.5.3 अर्थसंकल्पात महाराष्ट्र शासनाच्या वाट्याची तरतूद न करणे

पुन्हा, अर्थसंकल्प शीर्ष 2210 - वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य, 01 - शहरी आरोग्य सेवा - एलोपॅथी, 001 - संचालन आणि प्रशासन, (00) (12) - SUSGMC नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आणि पदव्युत्तर जागा वाढविण्यासाठी, 01 - अनुदान सहाय्य 2015-16 ते 2017-18 या कालावधीसाठी कार्यचालनात आणले. लेखापरीक्षणात निदर्शनास आले की या काळात अर्थसंकल्पामध्ये या शीर्षाखाली कोणतीही तरतूद केली नाही. यामुळे ***परिच्छेद 2.3.3.8*** मध्ये चर्चा केल्यानुसार सहा[31] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली नाही.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांचे उत्तर प्रतिक्षित आहे (जानेवारी 2020).

### 2.3.5.4 व्याजाची हानी

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून प्राप्त झालेला निधी ठेवण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँकेत स्वतंत्र समर्पित बँक खाते उघडण्यासाठी सामंजस्य करार केला. पदव्युत्तर जागांची निर्धारित संख्या निर्माण न झाल्यास सशक्तीकरण समिती व्याजासह हा निधी परत मागू शकते आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना सुद्धा न वापरलेला/गैरवापर केलेला निधी व्याजासह परत करण्याची आवश्यकता आहे.

लेखापरीक्षणांमध्ये असे निदर्शनास आले की सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांद्वारे बँक खाती उघडण्यात एक सारखेपणा नव्हता, भारत सरकारकडून अनुदान (पहिला हप्ता) मिळाल्यानंतर सहा[32] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी

---

[31] अकोला अंबाजोगाई, धुळे, नागपूर, सोलापूर आणि यवतमाळ.

[32] अकोला, औरंगाबाद, लातूर, मिरज, नांदेड आणि सोलापूर.

चालू खाते उघडले होते आणि पाच[33] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी बचत खाते उघडले होते. अशाप्रकारे, चालू खात्यावर ठेवलेल्या रकमेवर कोणतेही व्याज मिळत नसल्यामुळे चालू खात्यात ठेवलेल्या अनुदानाच्या रकमेवर मार्च 2019 पर्यंत चार टक्के वार्षिक व्याजदर गृहित धरल्यास ₹ 5.78 कोटी व्याजाचा तोटा झाला.

### 2.3.5.5 भारत सरकारच्या अनुदानावर उपार्जित झालेले व्याज विनावापर पडून राहिले

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने केंद्रीय वाट्यावर उपार्जित झालेल्या व्याजाला केंद्रीय वाट्याचा भाग मानले पाहिजे अशा सूचना दिल्या होत्या (मे 2018).

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय किंवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकडून वरील सूचनेची कोणतीही दखल घेण्यात आली नाही आणि दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी वेगवेगळ्या कालावधीसाठी मुदत ठेवीमध्ये/बचत खात्यात केंद्रीय अनुदान ठेवले. मार्च 2019 पर्यंत या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी मुदत ठेव आणि बचत खात्यावर व्याज ₹ 22.48 कोटी अर्जित केले.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी उत्तर दिले (जानेवारी 2020) की भारत सरकारद्वारा या मुद्द्यावरील स्पष्टतेच्या अभावामुळे राज्याची रक्कम वापरता आली नाही. उत्तर स्वीकार्य नाही कारण भारत सरकारने स्पष्टपणे अर्जित व्याजाला केंद्रीय वाट्याचा भाग म्हणून मानण्याची सूचना दिली होती (मे 2018).

### 2.3.5.6 निधींचा अनियमित उपयोग

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने सूचना दिल्या होत्या (ऑक्टोबर आणि डिसेंबर 2011) की निधी कोणत्याही प्रकारचे अपवाहन न करता विशिष्टरित्या पायाभूत सुविधांचा विकास, उपकरणांची खरेदी आणि प्राध्यापकांच्या भरतीसाठी वापरणे आवश्यक आहे. यापूर्वीच सूचना देण्यात आली होती (मार्च 2011) की निधीचा उपयोग विद्युत, नळकाम आणि रंगकामे इत्यादिंवर करण्यात येऊ नये.

चार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी[34] आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मंजुरी आदेशात तरतूद नसताना ₹ 8.11 कोटी वाचनालयाचे बांधकाम, नूतनीकरण, दुरूस्ती आणि विद्युत कामे इत्यादिंवर खर्च केले. तसेच, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या निर्देशांनुसार विद्युत आणि दुरूस्तीची कामे अनुज्ञेय नाहीत आणि पायाभूत घटकाच्या अंतर्गत केवळ नवीन भांडवली मालमत्ता निर्माण करण्याचे काम केले जाईल. अशाप्रकारे, योजनेंतर्गत करण्यात आलेल्या ₹ 8.11 कोटींचा खर्च अनुज्ञेय नसलेल्या बाबींवर अनियमितपणे वापरण्यात आला.

---

[33] अंबाजोगाई, धुळे, नागपूर, पुणे आणि यवतमाळ.

[34] औरंगाबाद, लातूर, मिरज आणि यवतमाळ.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी उत्तर दिले (जानेवारी 2020) की शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकडून तपशील मागविला आहे आणि त्यानंतर अनुपालन सादर केले जाईल.

### 2.3.5.7 अनियमित जादा खर्च

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने पदव्युत्तर जागा निर्माण करण्यासाठी/ वाढविण्यासाठी पायाभूत सुविधा, उपकरणे आणि प्राध्यापक घटकांसाठी घटकनिहाय अनुदान मंजूर केले (ऑक्टोबर-डिसेंबर 2011). या खरेदीस प्रशासकीय मान्यता वेळोवेळी आर्थिक शक्तीनुसार वैद्यकीय शिक्षण औषधी द्रव्ये विभाग/वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय/शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी दिली. तसेच, या खरेदीमध्ये प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्चाच्या प्रकरणांत सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती.

लेखापरीक्षणात आढळले की ₹ 5.14 कोटींच्या प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत चार[35] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये योजनेंतर्गत ₹ 7.44 कोटी खर्चून 38 उपकरणे खरेदी केली. यामुळे ₹ 2.30 कोटींचा जादा खर्च झाला. अशाप्रकारे, सक्षम प्राधिकरणाची पूर्व मंजुरी न घेता जास्त खर्च करणे अनियमित आहे.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी उत्तर दिले (जानेवारी 2020) की जादा खर्च हा वेळ आणि किमतीवाढीमुळे झाला आणि हा खर्च योजनेंतर्गत झालेली बचत/स्वीय प्रपंजी लेखे इत्यादिंमधून केला जात होता. उत्तर समर्थनीय नाही कारण जादा खर्चाच्या स्त्रोताचे तपशील दिले नाहीत आणि सक्षम प्राधिकरणाद्वारे सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त केल्या नाही.

## 2.3.6 देखरेख यंत्रणा

त्वरित सुधारात्मक कृति आणि भविष्यातील नियोजनाकरिता धडे घेणे या दृष्टिकोनातून विचलनाचा तपास तसेच कोणतीही योजना, कार्यक्रम अथवा प्रक्रियेच्या प्रगतिचा मागोवा घेण्यासाठी संनियंत्रण निर्णायक आहे. राज्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे बळकटीकरण/दर्जावाढ योजनेच्या देखरेखीमध्ये लेखापरीक्षणात खालील त्रुटी आढळल्याः

### 2.3.6.1 भारत सरकारच्या अनुदानाचे लेखापरीक्षण झाले नाही

भारत सरकारच्या अनुदान मंजुरी आदेशात, मंत्रालयाद्वारे/ मंजुरी प्राधिकरणाद्वारे अनुदानित संस्थेचे आंतरिक लेखापरीक्षण/लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याबाबत नमूद होते. असे आढळले की विहित केल्याप्रमाणे असे कोणतेही लेखापरीक्षण मंत्रालयाने किंवा मंजुरी प्राधिकरणाद्वारे केले गेले नाही.

सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी पुष्टी केली की असे कोणतेही लेखापरीक्षण कधीच झाले नाही.

---

[35] मिरज, नागपूर, पुणे आणि सोलापूर.

### 2.3.6.2 उपयोगिता प्रमाणपत्रांचे सादरीकरण

सामंजस्य कराराच्या अट 8 आणि सामान्य वित्तीय नियम, 2005 च्या नियम 212 मध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी दरवर्षी 15 मार्च आणि 15 सप्टेंबर पूर्वी वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाने यथोचितरित्या प्रति हस्ताक्षरित केलेली उपयोगिता प्रमाणपत्रे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे पाठविण्याबाबत नमूद केले आहे. असेही नमूद केले आहे की शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना दुसरा/ त्यानंतरचा हप्ता प्रथम/पूर्वीच्या हप्त्यासंदर्भातील उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेत सादर केल्यानंतरच देण्यात येईल.

लेखापरीक्षणात निदर्शनास आले की कोणत्याही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने डिसेंबर 2015 पर्यंत कोणतेही उपयोगिता प्रमाणपत्र आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे सादर केले नाही. तसेच, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे सादर केलेली उपयोगिता प्रमाणपत्रे वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांच्या प्रतिहस्ताक्षराशिवाय होती आणि उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यात झालेला विलंब 46 ते 85 महिन्यांच्या दरम्यान होता. पुढे असेही आढळून आले की मार्च 2019 पर्यंत ₹ 42.69 कोटींची उपयोगिता प्रमाणपत्रे प्रलंबित आहेत. वेळेत उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न केल्यामुळे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने ऑक्टोबर 2017 ते सप्टेंबर 2018 या कालावधीत महाराष्ट्र शासनाला दुसरा आणि शेवटचा हप्ता वितरित केला. अशाप्रकारे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी उपयोगिता प्रमाणपत्रांचे विलंबाने सादरीकरण केल्यामुळे पायाभूत सुविधांची कामे, उपकरणांची खरेदी आणि प्राध्यापकांची नियुक्ति यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकडील निधीच्या उपलब्धतेवर विपरित परिणाम झाला. यामुळे शेवटी पदव्युत्तर जागांची निर्मिती/वाढ झाली नाही.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी तथ्य स्वीकारले आणि सांगितले (जानेवारी 2020) की शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना योग्य प्रकारे उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

### 2.3.6.3 प्रगतीची प्रत्यक्ष पडताळणी

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये महाराष्ट्र शासन/भारत सरकार मार्फत योजनेच्या देखरेखीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी केलेल्या प्रगतीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासंदर्भात नमूद केले आहे. लेखापरीक्षणात आढळले की 2011-12 ते 2018-19 या कालावधीत वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग (महाराष्ट्र शासन)/भारत सरकारद्वारा अशी कोणतीही प्रत्यक्ष पडताळणी केली नाही. यावरून असे दिसून येते की या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी केलेल्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी कोणतीही देखरेख यंत्रणा अस्तित्वात नव्हती.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी लेखापरीक्षणातील निरीक्षण स्वीकारले (जानेवारी 2020).

### 2.3.6.4 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांद्वारे त्रैमासिक प्रगती अहवाल सादर न करणे

अनुदान मंजुरी आदेश (ऑक्टोबर 2011) मध्ये असे नमूद केले आहे की शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी केलेल्या क्रियाकलापांचा त्रैमासिक प्रगती अहवाल आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे सादर करावा.

लेखापरीक्षणात निदर्शनास आले की 2011-12 ते 2018-19 या कालावधीत कोणत्याही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने क्रियाकलापांचा कोणताही त्रैमासिक प्रगती अहवाल आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे सादर केला नाही.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी लेखापरीक्षणातील निरीक्षण स्वीकारले (जानेवारी 2020) आणि प्रगती अहवाल सादर करण्याच्या सूचना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना दिल्या.

### 2.3.6.5 टप्पा - 2 अंतर्गत अंतर विश्लेषण अहवाल आणि प्रस्ताव

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने 2018-19 ते 2020-21 या कालावधीत नवीन पदव्युत्तर वैद्यकीय जागा निर्माण करण्यासाठी राज्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे बळकटीकरण/दर्जावाढ योजनेचा दुसरा टप्पा सुरू केला (एप्रिल 2018). आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने महाराष्ट्र शासनाला अंतर विश्लेषण करण्याचे आणि निधिची घटकवार आवश्यकता दर्शविण्याऱ्या प्रस्तावाचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिले (जून आणि ऑक्टोबर 2018). त्यानुसार, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या (नोव्हेंबर 2018 आणि मे 2019).

लेखापरीक्षणात असे दिसून आले की सहा[36] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी अंतर विश्लेषण अहवाल तयार करणे आणि प्रस्ताव सादर करण्यासाठी कोणत्याही कृतिचा आरंभ केला नाही आणि दोन[37] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी या उद्देशासाठी एक समिती गठित केली (मे 2019) आणि उर्वरित तीन[38] शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी अंतर विश्लेषण अहवाल आणि प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांच्याकडे सादर केले (डिसेंबर 2018 ते मे 2019). अशाप्रकारे, निधीची घटकवार आवश्यकता दर्शविणारे सविस्तर प्रस्ताव अद्ययाप शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे बळकटीकरण/दर्जावाढ योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात

[36] अकोला, नागपूर, धुळे, नांदेड, सोलापूर आणि यवतमाळ.

[37] अंबाजोगाई आणि औरंगाबाद.

[38] लातूर, मिरज आणि पुणे.

महाराष्ट्र शासनाकडून आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे सादर करायचे बाकी आहेत.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांनी उत्तर दिले (जानेवारी 2020) की असा प्रस्ताव सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सादर केला जाईल.

### 2.3.7 निष्कर्ष

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय आणि महाराष्ट्र सरकारच्या निर्देश आणि देखरेखीविना जरी भारत सरकारला प्रस्ताव पाठविण्यात आले होते, तथापि, निधी मिळविण्यासाठी आणि खर्चाला प्राधान्य देण्याचे विस्तृत आराखडे तयार केले नव्हते. अर्थसंकल्पीय आणि खर्च नियंत्रणाचा अभाव दिसून आला. जरी भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाने 75:25 या प्रमाणात अनुरूप अनुदान प्रदान करायचे होते. तरी अनुदानाच्या बहालीमध्ये समन्वयिता नव्हती. विहित केल्याप्रमाणे प्रत्यक्ष प्रगतीचा आणि निर्धारित लक्ष्ये गाठल्याचा कोणताही अहवाल महाराष्ट्र शासनाद्वारे तयार केला नव्हता आणि सादर केला नव्हता. शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, मुक्त केलेल्या निधीपैकी 91 टक्के खर्चून, लक्षित 692 जागांपैकी फक्त 79 (11 टक्के) पदव्युतर जागा, योजनेच्या प्रारंभापासून सात वर्षांनंतर सुद्धा ज्यात दोन वर्षांचा विस्तारित कालावधी समाविष्ट आहे, निर्माण करू शकले. अशाप्रकारे, योजनेच्या कमकुवत अंमलबजावणीमुळे पदव्युत्तर शिक्षणाच्या सुविधांचे दर्जेवाढ, पदव्युत्तर विद्यार्थ्यांची ग्रहण क्षमता वाढवणे, नवीन आणि उच्च अभ्यासक्रम सुरू करणे, देशातील तज्ञांची कमतरता दूर करणे, भारतीय वैद्यक परिषदेने दर्शविलेल्या कमतरता दूर करणे जेणे करून विद्यमान अभ्यासक्रमांच्या अमान्यतेपासून महाविद्यालये वाचू शकतील आणि वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता, संशोधन आणि नैदानिक उपचार सुधारणे ही उद्दिष्टे साध्य करता येऊ शकली नाहीत.

महाराष्ट्र शासनाद्वारे योजनेचे संनियंत्रण आणि मूल्यमापन कमकुवत होते. म्हणून, महाराष्ट्र शासन/शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाद्वारे आवश्यकतेप्रमाणे अंतर विश्लेषण आयोजित करण्याची निकड आहे आणि राज्य शासकीय महाविद्यालयांचे बळकटीकरण/ दर्जावाढ योजनेच्या निदान दुसऱ्या चरणात अपेक्षित उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी तसेच चांगल्या कार्यान्वयनाकरिता तपशीलवार प्रस्ताव तयार करावयास हवे.

### 2.3.8 शिफारसी

1. शासनाने, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाला उपकरणांची खरेदी आणि उपकरणांच्या खरेदी प्रक्रिया, पायाभूत सुविधा कामांचे निष्पादन आणि चांगले समन्वय राखणाऱ्या प्राध्यापकाची नियुक्ती करण्यात घाई करण्याचे निर्देश द्यावे जेणे करून आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे पदव्युतर अभ्यासक्रम/जागांची, अमान्यता/नकार टाळता येईल;

2. योजनेचे दुसरा टप्पा आरंभ झाला असल्यामुळे शासनाने, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाला घटक निहाय निधीच्या आवश्यकतेसह तपशीलवार कृती योजना आखण्याचे आणि आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाला सादर करण्याचे निर्देश द्यावे;
3. शासनाने वेळेवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना निधी संवितरणाची खातरजमा करावी जेणे करून आवश्यक पायाभूत सुविधांची, उपकरणांची निर्मिती आणि पदव्युतर जागा वाढविणे/निर्मिती करिता प्राध्यापकाची नियुक्ति करता येईल. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाद्वारे निधीच्या योग्य उपयोगितेकरिता शासनाने आवश्यक अर्थसंकल्पीय नियंत्रणाची खातरजमा करावी; आणि
4. शासनाने, वेळेवर उपयोगिता प्रमाणपत्राच्या सादरीकरणाची खातरजमा वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाने करण्याबाबत निर्देश द्यावे व सर्व स्तरावर योजनेची उद्दिष्ट्ये साध्य करण्याकरिता संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रण यंत्रणा सक्षम केली जावी.

## नगर विकास विभाग

## बृहन्मुंबई महानगरपालिका

### 2.4 भाडेपट्टी करारानुसार अधिमुल्याची वसुली न करणे

**स्पोर्ट्स क्लबकडील नियतकालिक माहिती/आर्थिक विवरणपत्रे प्राप्त करुन भाडेपट्टी कराराच्या अनुपालनावर संनियंत्रण ठेवण्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेस आलेल्या अपयशाच्या परिणामी क्रीडा-व्यतिरिक्त उपक्रमांपासून ₹ 20.55 कोटींच्या अधिमुल्याची वसुली झाली नाही.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेने वरळी, मुंबई येथे असलेली 70,376 चौरस मीटर जमिन 99 वर्षाच्या भाडेपट्ट्याने देण्यासाठी एका स्पोर्ट्स क्लबशी करार केला (मे 1993). स्टेडियम, जलतरण तलाव, बॅडमिंटन हॉल आणि क्लब हाऊस यासारख्या क्रीडा सुविधांसाठी सदर जागा भाडेपट्टयाने देण्यात आली होती.

कराराच्या अटी व शर्तीनुसार स्पोर्ट्स क्लब ने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूर्वलिखित संमतीशिवाय परिसर किंवा त्यातील कोणताही भाग अभिहस्तांकित किंवा हस्तांतरित करू नये. क्रीडा उपक्रमांव्यतिरिक्त इतर कोणत्याही उद्देशाने स्टेडियम वापरण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून परवानगी घेणे देखील आवश्यक होते.

**परिशिष्ट 2.3.1**

**(संदर्भः परिच्छेद 2.3.3.5)**

**प्राध्यापक घटकांतर्गत मंजूर निधीचे विचलन दर्शविणारे विवरण**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नाव | पदव्युतर मंजूर अभ्यासक्रमांची संख्या | तांत्रिक मूल्यांकन समितीच्या शिफारसींनुसार पदव्युतर जागांचे लक्ष्य | मंजूर रक्कम | प्राप्त रक्कम | झालेला खर्च | प्राध्यापक घटका व्यतिरिक्त झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अंबाजोगाई | 7 | 28 | 2.38 | 0.90 | 0 | 0.50 |
| 2 | औरंगाबाद | 6 | 18 | 2.16 | 0.81 | 0 | 0.81 |
| 3 | लातूर | 18 | 60 | 5.12 | 1.92 | 0 | 1.92 |
| 4 | नांदेड | 6 | 25 | 2.16 | 0.815 | 0 | 0.361 |
| 5 | सोलापूर | 20 | 65 | 8.85 | 3.32 | 0 | 3.32 |
| 6 | यवतमाळ | 6 | 22 | 2.16 | 0.81 | 0 | 0.81 |
| **एकूण** | | **63** | **218** | **22.83** | **8.575** | **0** | **7.721** |

**परिशिष्ट 2.3.2**

**(संदर्भः परिच्छेद 2.3.3.6)**

**आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाची परवानगी प्राप्त करण्यास विलंब झाल्यामुळे नवीन पदव्युतर अभ्यासक्रम सुरू झाले नाही/पदव्युतर जागांमध्ये वाढ झाली नाही**

| अनु क्र. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नाव | पदव्युतर अभ्यासक्रमाचे नाव | अस्तित्वातील पदव्युतर जागांची संख्या | योजनेअंतर्गत वाढविण्यात येणाऱ्या अतिरिक्त पदव्युतर जागांची संख्या | शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांद्वारे घटकनिहाय मंजूर रक्कम आणि झालेला प्रत्यक्ष खर्च (₹ कोटी मध्ये) | | | | | | | | झालेल्या खर्चाचा कालावधी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मूलभूत सुविधा | | साधन सामग्री | | प्राध्यापक | | एकूण | | मूलभूत सुविधा | साधन सामग्री |
| | | | | | मंजूरी | खर्च | मंजूरी | खर्च | मंजूरी | खर्च | मंजूरी | खर्च | | |
| 1 | अंबाजोगाई | औषधनिर्माण शास्त्र | 3 | 1 | 0 | 0 | 0.06 | 0.10 | 0 | 0 | 0.06 | 0.10 | -- | डिसेंबर 2014 ते जून 2016 |
| | | बधिरीकरण | 3 | 2 | 0 | 0 | 0.93 | 1.98 | 0 | 0 | 0.93 | 1.98 | -- | मार्च 2014 ते मार्च 2019 |
| | | बालरोगशास्त्र | 1 | 1 | 0 | 0 | 0.17 | 0.66 | 0 | 0 | 0.17 | 0.66 | -- | मे 2013 ते मार्च 2019 |
| | | ओबीजीवाय | 1 | 3 | 0 | 0 | 0.68 | 0.83 | 0 | 0 | 0.68 | 0.83 | -- | मे 2013 ते मार्च 2019 |
| | | शल्यक्रिया | 3 | 2 | 0 | 0 | 4.51 | 4.50 | 0 | 0 | 4.51 | 4.50 | -- | जानेवारी 2014 ते मार्च 2019 |
| 2 | औरंगाबाद | शरीररचना | 3 | 4 | 0.03 | 0.03 | 0.03 | 0.03 | 0 | 0 | 0.06 | 0.06 | एप्रिल 2013 ते मार्च 2014 | एप्रिल 2012 ते मार्च 2013 |
| | | शरीरशास्त्र | 3 | 8 | 0 | 0 | 0.31 | 0.34 | 0 | 0 | 0.31 | 0.34 | -- | एप्रिल 2012 ते मार्च 2016 |
| | | पीएसएम/ पीसीएम | 3 | 6 | 0.02 | 0.02 | 0 | 0 | 0 | 0 | 0.02 | 0.02 | एप्रिल 2016 ते मार्च 2017 | -- |
| | | रेडिओलॉजी | 2 | 3 | 0 | 0 | 0.90 | 0.80 | 0 | 0 | 0.90 | 0.80 | -- | एप्रिल 2015 ते मार्च 2018 |
| 3 | यवतमाळ | रेडिओलॉजी | 0 | 3 | 0 | 0 | 0.90 | 1.72 | 0 | 0 | 1.00 | 1.72 | -- | एप्रिल 2015 ते मार्च 2017 |
| | **एकूण** | **10** | **22** | **33** | **0.05** | **0.05** | **8.59** | **10.96** | **0** | **0** | **8.64** | **11.01** | | |

**परिशिष्ट 2.3.3**

**(संदर्भः परिच्छेद 2.3.4.2)**

**बाबनिहाय निधीसाठी विनंती पाठविली नाही**

| अनु क्र. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नाव | केंद्राचा प्राप्त हिस्सा | पदव्युतर अभ्यासक्रमांची संख्या | योजने अंतर्गत मंजूर पदव्युतर जागांची संख्या | तांत्रिक मूल्यमापन समितीद्वारे मंजूर रक्कम आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाद्वारे करण्यात आलेल्या खर्चाची घटक निहाय स्थिती (₹ कोटी मध्ये) | | | | | | | | निर्मिलेल्या पदव्युतर जागांची प्रत्यक्ष संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मूलभूत सुविधा | | साधन सामग्री | | प्राध्यापक | | एकूण | | |
| | | | | | मंजूरी | खर्च | मंजूरी | खर्च | मंजूरी | खर्च | मंजूरी | खर्च | |
| 1 | अकोला | 14.99 | 8 | 18 | 0 | 0 | 2.5 | 1.07 | 0 | 0 | 2.50 | 1.07 | 10 |
| 2 | अंबाजोगाई | 12.18 | 12 | 22 | 0 | 0 | 9.48 | 10.94 | 0.36 | 0 | 9.84 | 10.94 | 3 |
| 3 | औरंगाबाद | 5.91 | 9 | 44 | 0.37 | 0.16 | 5.65 | 2.28 | 0.36 | 0 | 6.38 | 2.44 | 2 |
| 4 | मिरज | 6.68 | 5 | 17 | 0 | 0 | 3.69 | 0.4 | 0 | 0 | 3.69 | 0.4 | 7 |
| 5 | नागपूर | 18.21 | 2 | 4 | 0.2 | 0 | 0.24 | 0.3 | 0 | 0 | 0.44 | 0.3 | 0 |
| 6 | नांदेड | 16.72 | 5 | 15 | 0 | 0 | 7.605 | 3.06 | 0 | 0 | 7.60 | 3.06 | 0 |
| 7 | सोलापूर | 9.96 | 3 | 17 | 0 | 0 | 0.5 | 0.32 | 0.72 | 0 | 1.22 | 0.32 | 0 |
| 8 | यवतमाळ | 2.97 | 6 | 20 | 0.3 | 0 | 1.45 | 2.24 | 0 | 0 | 1.75 | 2.24 | 2 |
| **एकूण** | | **87.62** | **50** | **157** | **0.87** | **0.16** | **31.115** | **20.61** | **1.44** | **0** | **33.42** | **20.77** | **24** |